७ : १०८

म. ग्रं. सं. ठाणें

| विषय | लेखक रामराव बाळकृष्ण कीर्लेकर | सन १८८७ |
|---|---|---|
| ८१६ | | |
| ग्रंथालय क्रमांक | पुस्तकाचें नांव सुंदराबाई | |
| २१८८ | | |

७८

कादं

# सुंदराबाई.

(लहानशी उपदेशपर आणि मनोरंजक गोष्ट.)

ही

**रामराव बाळकृष्ण कीर्तिकर**

यांनीं लिहिली.

ती

## वासुदेव मोरेश्वर पोतदार

यांनीं

मुंबईत

'देव्हारे प्रिंटिंग प्रेस' मध्यें छापून प्रसिद्ध केली.

---

सुधारलेली आवृत्ति २ री.

---

(या पुस्तकासंबंधी सर्व प्रकारचे हक प्रसिद्ध करणारानें आपल्याकडे ठेविले आहेत.)

---

सन १८९१.

---

किंमत एक आणा.

" हें पुस्तक केवळ लोकमनरंजनार्थ लिहिलें नाहीं; ह्यापासून वाचकांस कांहींतरी बोध व्हावा म्हणून लिहिलें आहे. ह्या पुस्तकापासून रंजन होण्यापेक्षां बोध झालेल्या वाचकांची संख्या अधिक निघाली तर माझ्या श्रमाचें फळ झालें असें मी समजेन.

पुस्तककर्ता

## अभिप्राय.

रा॰ रा॰ वि॰ आपली " सुंदराबाई " नांवाची गोष्ट मीं समग्र वाचून पाहिली. ती चांगली मनोरंजक व बोधपर आहे. तिचें तात्पर्य सर्व सूज्ञ स्त्रियांनीं निरंतर ध्यानांत बाळगण्याजोगें आहे. अशा प्रकारच्या लहान लहान बोधपर गोष्टी चांगल्या भाषेनें लिहिलेल्या छापून प्रसिद्ध झाल्यास त्यांच्या वाचनानें आपल्या महाराष्ट्र भगिनींस मोठा लाभ होईल असें मला वाटतें. आपल्या लेखाची भाषा कित्येक ठिकाणीं मनोवेधक आहे. ह्या लहानशा पुस्तकास लोकाश्रय मिळून अशीं दुसरीं पुस्तकें लिहिण्यास आपणास उत्तेजन मिळावें असें मी मनापासून इच्छितों.

मुंबई, ता॰ २४ आक्टोबर सन १८८७.

आपला,
बळवंत भाऊ नगरकर.

" सुंदराबाई " ही गोष्ट फार चांगली बोधप्रद आहे. हिची भाषाही बहुत करून शुद्ध व सरळ आहे. ही गोष्ट आमच्या स्त्रीजनांस फार आवडेल आणि बोधदायक होईल, असें मला वाटतें.

मुंबई, ता॰ २५ आक्टोबर सन १८८७.

विनायक कोंडदेव

वाईच्या
अ-

# सुंदराबाई.

## ( लहानशी उपदेशपर व मनोरंजक गोष्ट. )

---

वाचकहो, सुंदराबाईचा पति मरून गेल्यास नुकतेच पंधरा दिवस होऊन गेले होते. अहाहा !!! काय ती भव्य इमारत! परंतु एक जीव—तशांत घराचा धनीच—गत झाल्यामुळें, तीच स्मशानवत् दिसत होती. काय ती आरबी घोड्यांची जोडी !!! काय तो वाड्यांतील शिपायांचा थाट !! व ( गार्डींतली ) नारायणरावांची मुद्रा !!! ह्यांची आठवण पडली ह्मणजे ते अजून जिवंतच आहेत कीं काय, असा भास होई. पण हें सर्व मृगजलाप्रमाणें होतें. कारण त्या बिचाऱ्याच्या शरीराची राखरांगोळी तर स्मशानांतील मातीशीं केव्हांच मिसळून गेली होती. शिपायांनीं तर नारायणरावानें राम ह्मणतांच घरचा रस्ता धरिला. कारण नारायणरावांच्या मागें त्यांचें बरोबर चालतें ना. तशांत नारायणरावांच्या विधवा स्त्रीला इतक्या चाकरांची आतां जरूर काय? नारायणराव हे सर्व बंधूंत वडील होते. मरतेसमयीं नारायणरावानें रूढीप्रमाणें आपला सर्व कारभार आपल्या बायकोच्या हातीं न देतां, जरी भावांमध्यें वैमनस्य होतें तरी त्यांच्या स्वाधीन केला. मग काय विचारतां? अर्थात् ते दोघेही गत बंधूच्या संपत्तीवर मौजा मारूं लागले. ज्या सुंदराबाईचा सर्व मालमत्तेवर कांहीं दिव-

हें ग

ह्यांचा अंमल चालत होता, तिला शास्त्राप्रमाणें एकांपऱ्यांत मुळमूळ रडत बसणें भाग पडलें. एक पति गत झाल्यामुळें त्या बिचाऱ्या सुंदराबाईला अशी स्थिति प्राप्त झाली ना.!! हर! हर!! नशीब तिचें!!! ह्मणून भगिनींनो! तुमचा पति कितीही श्रीमंत असला तरी उन्मत्त होऊं नका. तुमच्या सर्व सुखाचें भांडार जो पति तोच जर नाहींसा झाला, तर तुमचा उन्मत्तपणा चालेल काय? नाहीं, मुळींच चालायाचा नाहीं. परंतु आमची सुंदराबाई मुळींच उन्मत्त नव्हती. उलट नारायणरावांच्या मागें तिच्या दिरांनीं जरी तिचाच पुष्कळ छळ केला, तरी तिनें ह्याविषयीं कोणाजवळ ब्र तरी काढला काय? नाहीं. उलट तीच त्यांच्यांशीं मिळून असे. असें असतांही ते दुष्ट आल्यागेल्या माणसांस तिच्याविषयीं भलभलतेंच सांगत. असो; "सत्ते पुढें शहाणपण नाहीं," एवढें खरें. आतां ही सुंदराबाई कोण, हे नारायणराव कोण, ह्यांच्याविषयीं आमच्या वाचकांस भ्रांति पडली असेल, तर ती आतां दूर केली पाहिजे. सुंदराबाई ही एका कुलीन घराण्यांत जन्मली होती. हिचा बाप मोठा श्रीमंत व्यापारी होता. कैलासवासी नारायणरावांच्या वडिलांचें व सुंदराबाईच्या वडिलांचें मोठें सख्य होतें. ह्या दोघांची व्याही व्याही होण्याची फार इच्छा होती व ती परमेश्वरकृपेनें सिद्धीसही गेली. पुढें कांहीं दिवसांनीं ते दोघेही निवर्तले. सर्व कारभार नारायणरावांच्या हातीं आला. सुंदराबाईला दोन बहिणी होत्या; पण त्याही बिचाऱ्या सुंदराबाईसारख्याच अभागी होत्या. तरी हिच्यासारखा त्यांना जाच नव्हता.

त्या सुखानें आपआपल्या घरीं रहात असत. सुंदराबाईच्या मोठे बहिणीस चार मुली व दोन मुलगे मिळून सहा अपत्यें होतीं. धाकव्या बहिणीस एकच मुलगी होती. वर सांगितलेल्या नारायणरावांच्या दोघां बंधूसही मोठ्या हुद्यांच्या जागा होत्या. नारायणरावांचें व त्यांच्या बंधूचें कधींही जमत नसे आणि ह्यांचें कारण त्यांच्या बंधूंच्या मनाचा हलकेपणा हें होय. नारायणरावांस दोन पुत्र व दोन कन्या होत्या. वडील मुलाचें नांव आनंदराव व धाकट्याचें माधवराव; मुलींचीं नांवें शांताबाई व दुर्गाबाई अशीं होतीं. ह्यांचीं लग्नें नारायणराव जिवंत असतांनाच झालीं होतीं. नारायणराव हे मोठे हुद्देदार होते. दुर्गाबाईचा नवरा ह्या वेळीं बी. ए. च्या परीक्षेंत पास होऊन गणितांत पहिला आल्याकारणानें त्यास ९०० रु. ची स्कॉलरशिप मिळाली होती, व शांताबाईचा नवरा वैद्यकींत निपुण असल्यामुळें एम. डी. च्या परीक्षेंत पास झाला. सासूबाईस असा जाच होत आहे असें पाहून, दोघां जांवयांस फारच वाईट वाटून त्यांनीं सुंदराबाईच्या दिरांवर फिर्याद केली. सरकारदरबार होऊन शेवटीं सुंदराबाईची सर्व मालमत्ता व तिचें सर्व सामान तिला परत मिळालें व तिचा तिच्या दिरांनीं छळ केल्यामुळें त्यांची अर्धोअर्ध दौलत सरकारानें जप्त केली व त्यांस एका वर्षाची काळेपाण्याची शिक्षा दिली. तेथेंच त्यांनीं आत्महत्या करून घेतली. याप्रमाणें व्यवस्था झाल्यावर सुंदराबाई आपल्या दिरांपासून विभक्त झाली. तिचे दोघेही मुलगे अशा समयीं दुर्गाबाईच्या नवऱ्याबरोबर शिकत होते. काय चमत्कार

सांगावा कीं, सुंदराबाईला पतीच्या दुःखाचा विसर पडत चालला होता तोंच एका गृहस्थानें फसवून हिच्या बऱ्याच संपत्तीवर डल्ला मारिला. परंतु ही जबर छातीची बायको मुळींच डगली नाहीं. तिनें ह्मणावें कीं, "सरकारदरबारांत जसा पैसा गेला तसा हाही गेला, आतां त्याच्याविषयीं हळहळ बाळगून तो काय परत यावयाचा आहे! नशीब आपलें." खरोखर एखादा पुरुष देखील ह्या दुःखानें हा लोक सोडून परलोकीं गेला असता; पण धन्य त्या सुंदराबाईची. याविषयीं एक संस्कृत कवि ह्मणतो, "सुखं वा यदिवा दुःखं प्रियं वा यदिवा प्रियं। प्राप्तंप्राप्त मनुभवेत् हृदयेना पराजिता ॥" सारांश, सौख्य प्राप्त झाल्यास फाजील आनंद मानूं नये. दुःख झाल्यास अतिशय दुःखही मानूं नये. जें जें वाईट किंवा बरें आपल्या नशिबीं आलें असेल तें तें मुकाट्यानें भोगावें. असो; ह्यापुढें सुंदराबाई मोठ्या काटकसरीनें वागूं लागली. पुष्कळ लोक गरिबी आली तरी मोठ्या डामडौलानें वागतात; परंतु तसें करणें सुंदराबाईला बिलकुल आवडत नसे. हीच सुंदराबाई जर आत्नां मोठ्या डामडौलानें वागती, तर ती खचित धुळीस मिळाली असती. पण ती पडली शहाणी. संसारशकट कसें हांकावें हें ती पूर्णपणें जाणत होती. कित्येक लोक गरीब स्थिति प्राप्त झाली असतां, लोकनिंदेच्या भयास्तव उधळा खर्च करितात, आणि धुळीस मिळतात. ह्यामुळेंच पुष्कळ घरें धुळीस मिळालीं आहेत. असो. कांहीं दिवसांनीं सुंदराबाईनें आपल्या दोन मुलांच्या लग्नाचा बेत केला. त्यांना देखील श्रीमंत

राण्यांतून मुली सांगून आल्या होत्या. आपल्या स्थिती-ा अनुसरून तिनें दोन मुलांचीं लग्नें उरकून घे-ीं. वडील सुनेचें नांव मथुराबाई व धाकटीचें हिरा-ई असें ठेविलें. मथुराबाई स्वभावानें कडक होती; पण ती ह्या घरांत येतांच सुधारत चालली होती. कलहरूपी शत्रूचा शिरकाव आमच्या ह्या लहान राज्यांत अजून झाला नव्हता. शांततेविषयीं सुंदराबाईच्या घराची प्रसिद्धि होती. दोघेही भाऊ वयांत आल्यावर ते कोणतीही गोष्ट एकमेकांच्या अनुमताशिवाय करीत नसत. हीं चार बहीणभांवडें व ह्या दोघी सुना मोठ्या एकोप्यानें वागत. सुंदराबाईच्या दोघी मुली शांताबाई व दुर्गाबाई ह्या भावजयांस बहिणींप्रमाणे मानीत असत. घरांतील सर्व मंडळी मोठ्या पहांटेस उठे. स्नान झाल्यानंतर सुनांनीं सासूबाईस भाज्या चिरून द्याव्या, स्वयंपाकघरांतील केर काढावा व भांडीं विसळून ठेवावीं. जेवणखाण झाल्यावर चार घटका मनरंजनार्थ सुंदराबाई सुनांस पोथी सांगत बसत असे.

सासूबाईच्या सहवासानें मोठी सून सुधारत चालली होती; पण चमत्कार काय सांगावा कीं, ज्याप्रमाणें तापानें उचल घेतल्यावर बहुधा मनुष्य बरा होत नाहीं, त्याचप्रमाणें मथुराबाईच्या स्वभावानें उचल खाल्ली. शांताबाई मातृगृहीं बाळंतपणाकरितां आली होती, हें तिच्यानें सहन करवेना. ती आपल्या जावेजवळ वडील नणंदेविषयीं मलभलतें सांगे. ती तें वर्तमान शांताबाईस सांगे. पुष्कळ दिवस हें सर्व शांताबाईनें सहन केलें. माझ्या वाच-

कांस ह्याचा पूर्णपणें अनुभव असेलच. असो. असें जे- व्हां झालें तेव्हां शांताबाईनें ही गोष्ट आपल्या आईजवळ सांगितली. ज्याअर्थी सुंदराबाई सुज्ञ व विचारी होती, त्या- अर्थी तिनें ह्याचा योग्य रीतीनें न्याय करून, मग ती गोष्ट आपला वडील मुलगा जो आनंदराव ह्याच्या कानावर घातली. तिला इतका विचार करण्याचें कारण असें होतें कीं, कदाचित् शांताबाईनें तिच्यावर खोटा आळ घेतला न- सेल असें कशावरून? जरी शांताबाई तिची मुलगी होती, तरी तिच्यानें खरा न्याय केल्यावांचून राहवेना. कारण सध्यां अशी चाल आहे कीं, सून किती जरी चांगली असली व मुलगी जरी दुष्टस्वभावाची असली, तरी त्या मुलीची आई तिच्या बाजूला न्याय करून त्या गरीब चांगल्या सुनेस व्यर्थ छळते. तर बायांनो! असें करणें हें महत्पाप! असो. सुंदरा- बाईनें ही गोष्ट आपल्या वडील मुलास सांगितल्यावर तो आईस ह्मणाला, "आई, तूं ही गोष्ट बिलकुल मनावर घेऊं नको, त्याचा मी लवकरच बंदोबस्त करतों." पण मथुरा- बाईनें आपल्या नवऱ्याच्या मनांत असें भरवून दिलें कीं, जो आनंदराव बहिणीकरितां जीव टाकीत असे, तो तिच्याबरोबर उघड भांडण्यास तयार झाला. कलहरूपी शत्रूनें ह्या लहानशा राज्यावर चाल केली ह्मणावयाची. कलहरूपीशत्रूनें एखाद्या कुटुंबावर चाल केली ह्मणजे त्या कुटुंबाची कशी दुर्दशा होते हें बहुतेकांस माहीत असेलच. परंतु माधवरावास हा प्रकार अगदीं आवडला नाहीं. त्यानें वडील बंधूस पुष्कळ समजुतीच्या गोष्टी सांगितल्या, परंतु व्यर्थ. माधवराव ह्मणाला, "दादा, तूं इतका विद्वान् असून

यःकश्चित् बायकोच्या नादीं लागतोस!" असें बोलतांच आनंदराव ह्मणाला, "तूं मजपेक्षां लहान आहेस, तुला माझ्या गोष्टीमध्यें बोलण्याची जरूर नाहीं." त्याच दिवसापासून दोघां भावांमध्यें वांकडें पडलें. पहा! एका क्षुल्लक कारणावरून घरांत बेबनाव झाला!! सुंदराबाईस ह्या गोष्टीविषयीं फारच खेद वाटे. पहा, गतभर्तृकेची कशी व्यवस्था होते ती! पति जिवंत असला तर साध्वीस वनवास देखील सुखदायक होईल, परंतु तोच जर गत झाला, तर तिला एखादा राजवाडा स्मशानाप्रमाणें भासेल. ह्मणून भगिनींनो, मी तुह्मांस वारंवार सांगतों कीं, जोंपर्यंत परमेश्वर तुह्मांस पतिसमागमें ठेवील तोंपर्यंत त्याची एकनिष्ठपणें सेवा करा. स्त्रियांस पतीसारखें दुसरें दैवतच नाहीं. तुह्मीं हजारों व्रतें जरी आचरलीं व पतिव्रतेचे गुण जर तुमच्या मध्यें नाहींत, तर हीं सारीं व्रतें तुह्मांस फलद्रुप होणार नाहींत, उलट देवाचा तुह्मांवर कोप होईल. असो; दिवसें दिवस सुंदराबाईच्या घरीं कलहाचें प्राबल्य फार वाढत चाललें. वडील सून तर सासू जिवंत असतांच स्वतःला यजमानीन ह्मणूं लागली, व ती सासूबाईस जुमानीनाशी झाली. आनंदराव तर कळसूत्री बाहुली बनून राहिला. बायकोनें जसें नाचवावें तसें तो नाचे. परंतु हें सारें वर्तमान शांताबाईच्या नवऱ्यास कळतांच, त्यानें बायकोला आपल्या घरीं येण्यास सांगितलें. तिला प्रसूत होऊन नुकताच पंधरवडा झाला होता, तेव्हां सुंदराबाई तिला कशी बरें पाठवील! शेवटीं जांवयजी स्वतः सुंदराबाईस येऊन

भेटले व ह्मणाले, " माझी बायको जर तंट्याचें मूळ कारण आहे तर तिलाच येथून नेली असतां तंटा होणार तरी कोठून ?"

**सुंदरा०**—काय. शांताबाई तंट्याचें मूळ कारण ? आमची वडील सून फारच चांगली व समजूतदार मुलगी. तिला तर मीं पोटच्या लेंकराप्रमाणें लेखित असें आणि तिनें आतां माझ्या कुचेष्टा चालविल्या आहेत ना ? मला तर आतां कंटाळा आला ह्या संसाराचा.—त्या घरांत होतें तेथें दिरांचा त्रास. येथें आलें तर हा त्रास, एकून सुख काय तें माझ्या नशीबीं नाहींच !

**जा०**—उगाच कशाला तुह्मी आपल्या जिवाला त्रास करून घेता ? तिला मी घरीं नेतों ह्मणजे सर्व झालें व तिचें बाळंतपण सरलें ह्मणजे ती कधीं कधीं तुमच्या भेटीस येत जाईल.

**सुंदरा०**—छीः ! छीः !! नेण्याची गोष्ट आतां काढूंच नका. मी काय पिकलें पान, आज आहे उद्यां नाहीं. जगलें वांचलें तर फार फार एक दोन वर्षें; मग तुह्मी व तुमची बायको चिरकाल सुखानें नांदा. सासूबाईचा इतका आग्रह पाहून जांवईबुवा कांहीं एक न बोलतां, तिचा निरोप घेऊन घरीं गेले.

साडेपांच वाजण्याचा सुमार झाला होता, सूर्य अस्तास जात होता, जेथें तेथें उदास वाणें भासत होतें, पक्षी आपल्या घरट्यांत पिलांसह जात होते, सुंदराबाई ही, शांताबाई व हिराबाई यांजवळ बसून त्यांस गोष्टी सांगत होती. इतक्यांत पार्वतीबाईकडून ( सुंदराबाईची वडील

बहीण) घाबरलेला व धापा टाकीत एक गडी आला. त्यास पाहून सुंदराबाई ह्मणते, "कोण रे तो ?"

गडी०—नाय, मी रामा.

सुंदरा०—काय रे, कशाला रे आलास ?

रामा०—नाय बा, आनंदीबायनी ( पार्वतीबाईची मुलगी ) कायसँ घाबँर केलाय ह्मणूनशेनि तुमास्नी आताच का बोलावलॉय.

हें वर्तमान ऐकतांच सुंदराबाई जरी धीराची बायको होती तरी ती घाबरून गेली. तिनें लागलीच मोलकरणीस हाक मारून तिला शांताबाई व हिराबाई यांजवळ बसावयास सांगितलें व आपण निघून बहिणीकडे गेली. ह्यावेळीं तर आनंदीबाई बेशुद्ध पडली होती, व वैद्यांचे औषधोपचार चालले होते. पार्वतीबाईला तर उकाळ्यावर उकाळ्या येतच होत्या. वैद्यांचा उपाय तर खुंटला; कारण तिची दांतखिळी बसली होती. औषध तोंड उघडून घालावें तें लागलेंच बाहेर येई. त्यांनीं तिची आशाही सोडिली. सात वाजण्याच्या सुमारास आनंदीबाईनें एका किंकाळीसरसा प्राण सोडला. मग काय विचारतां ! जेथें तेथें रडण्याचा एकच कल्होळ झाला. अशा वेळीं मागें झालेल्या दुःखकारक गोष्टींचें स्मरण होतें, ह्याप्रमाणेंच सुंदराबाईची व तिच्या बहिणीची स्थिति झाली. परमेश्वरा, काय हा आह्मांवर प्रसंग ! सुख ह्मणून आह्मांस मुळींच नाहीं! हे देवा, आह्मीं तुझा काय अपराध केला, आह्मीं कोणांस गांजिलें ह्मणून तूं आह्मांस गांजितोस! ह्याप्रमाणें त्या व त्यांचे दुसरे सोयरेधायरे फार शोक करूं लागले.

सर्व तयारी होतांच आनंदीबाईस, ह्या नाशवंत देहाची जेथें रक्षा होते व ज्याचा मागमूसही लागत नाहीं त्या स्मशानभूमीप्रत नेलें. खरोखर आनंदीबाईसारखी बायको चार चौघांत मिळणें कठीण. तिच्या पतीनें तिच्यासाठीं फारच आकांत मांडिला. ती स्वरूपानें फारच सुंदर व विद्येंत फारच हुशार होती. तिचे गुण फारच अलौकिक होते. लहानपणीं आनंदीबाईनें संस्कृताचा बराच अभ्यास केला होता, त्यामुळें तिनें नानातऱ्हेचे मनोरंजक व उपदेशपर संस्कृत ग्रंथ वाचून आपल्या भावंडांचें व शेजाऱ्यापाजाऱ्यांचें मनोरंजन करावें. अहाहा! किती पण ती मनमिळाऊ! ज्याप्रमाणें सध्यांच्या कित्येक स्त्रियांस डामडौल असतो तसा तिला मुळींच नव्हता. ती लहानपणापासून घरकामांत मोठी दक्ष होती. कोठलेंही काम करणें तें ती मोठ्या विचारानें करीत असे. असो; आतां आपण सुंदराबाईच्या घराकडे वळूं. आनंदीबाईला बारा दिवस झाल्यावर सुंदराबाई आपल्या घरीं आली. ह्या सुमारास सुंदराबाईच्या वडील सुनेस नव मास पूर्ण होत आले होते. तिला माहेरीं जातां येईना; कारण तिची आई फार आजारी होती. मग बाळंतपणीं तिची शुश्रूषा कोण करणार? तशांत ही पडली वाईट स्वभावाची बायको. तिनें श्वशुरगृहींच रहाण्याचा बेत केला. ती सासूनणंदांशीं गोडीगुलाबीनें वागूं लागली. कोण मसलत ही! ज्याअर्थी सुंदराबाईचें घर सुस्वभावाचें होतें त्याअर्थी त्यांना ह्या गोष्टीचा फारच आनंद वाटला. प्रसूत झाल्यानंतर तिनें आपला पूर्वक्रम चालू केला. "गरज सरो आणि वैद्य

मरी " अशा न्यायानें ती वागूं लागली. आनंदरावही गरज सरतांच कृतघ्न झाला. तो पुन्हा घरांतील मंडळी-बरोबर भांडण करूं लागला. पुरुष एकदां स्त्रीलंपट झाला ह्मणजे खून करण्यास देखील प्रवृत्त होतो. ह्या स्त्रियांनीं इंद्रचंद्रासारख्या पुण्यशीलांची लटपट उडवून दिली, तेथें बिचाऱ्या आनंदरावासारख्या पामराचा काय पाड? शान्तिसुखाची मथुराबाईस मुळींच आवड नसे. कलह करणें ह्मणजे तिला मोठें भूषण वाटे. हिचें अर्भक दिवसें दिवस वाढत चाललें. त्याचा व शांताबाईच्या मुलाचा व्हावा तंटा, व लहान मुलांच्या भांडणामुळें मोठ्यामध्यें व्हावें भांडण, असें करून करून सूनबाईनें सासूबाईस खाट धरावयास लाविली, व कांहीं दिवसांनीं ती बिचारी पुण्यशील सुंदराबाई स्वर्गलोकीं गेली. हर! हर! परमेश्वरा, तिनें जन्मांत सुख ह्मणून भोगिलें नाहीं ना! यःकश्चित् सुनेच्या त्रासानें ती परलोकीं गेली ना !! सुंदराबाईनें राम ह्मणतांच दोघे भाऊ विभक्त झाले. मथुराबाईस संसार कसा चालवावा हें माहीत नसल्यामुळें मोठी पंचाईत पडत असे. स्वयंपाक कसा करावा हें तिला ठाऊक नसल्यामुळें नवऱ्याचे व तिचे खाण्यापिण्याचे हाल होत असत. त्यास हा त्रास सहन न होऊन तो नेहमीं भोजनगृहांत जाई. असा प्रकार नेहमीं चाले. आनंदराव भोळा असल्यामुळें लौकरच वाईट लोकांच्या संगतीस लागला. ज्या आनंदरावाला रात्रीं बाहेर जाणें मुळींच माहीत नव्हतें, तो आनंदराव आतां रात्रींचे बारा बारा एक एक वाजेपर्यंत बाहेर राहूं लागला. पुढें हा सुराताईचा

गर्दी भक्त बनून गेला. मग काय विचारतां? जी मथुराबाई आपली कमान अगोदर नवऱ्यावर चालवी, तीच आतां त्याचा असा मार खाई कीं, तिला जीव अगदीं नकोसा होई. अशा वेळीं तिला सासूबाईच्या कारकीर्दीतल्या गोष्टींचें स्मरण होऊन पश्चाताप होई. परंतु पाठीमागून त्याचा काय उपयोग? शेवटीं बिचाऱ्या आनंदरावाचाही सुरातांईतच अंत झाला! सुंदराबाई मेल्याबरोबर तिच्या दोघी मुली आपआपल्या नवऱ्याच्या घरीं सुखानें नांदूं लागल्या व माधवरावास मोठा लौकिक मिळून तोही सुखानें काळक्रमण करूं लागला. पहा, भगिनींनो, ती मथुराबाई आपल्या गैरवर्तणुकीमुळें व आळसामुळें वैधव्य स्थितींत राहून सर्वांचे जाचाखालीं राहावीना! ह्मणून तुह्मी मथुराबाईसारख्या न वागतां, तिच्या पुण्यशील सासूचा कित्ता घ्याल तर त्यांतच तुमचें कल्याण आहे. सारांश, मला इतकेंच सांगायाचें कीं, सूज्ञ वाचकांनीं ह्यांतील सार घेऊन त्याप्रमाणें वर्तन करावें अशी माझी आशा आहे.

समाप्त.

## ...तदारांची नीतिपर व मनोरंजक

## ...स्तकमाला.

...रुणराघव—हें संस्कृत उत्तररामचरित्राच्या आधारानें कादंबरीच्या पद्धतीवर मराठींत लिहिलें आहे. किं. १रु.

...ललितवत्सराज (पूर्वार्ध)—हें संस्कृत रत्नावली नाटिकेच्या आधारानें लिहिलें आहे. किंमत ८ आणे.

ललितवत्सराज (उत्तरार्ध)—हें संस्कृत प्रियदर्शिका नाटिकेच्या आधारानें लिहिलें आहे. किंमत ८ आणे.

चारुदत्त आणि वसंतसेना—हें संस्कृत मृच्छकटिकाच्या आधारानें लिहिलें आहे. किंमत १ रुपया.

प्रणयिमाधव—हें संस्कृत मालतीमाधवाचे आधारानें कादंबरीसारखें लिहिलें आहे. किंमत १ रुपया.

आर्यचाणक्य—हें संस्कृत मुद्राराक्षस नाटकाच्या आधारानें कादंबरीसारखें लिहिलें आहे. किंमत १ रुपया.

विदग्धपुरूरवा—हें संस्कृत विक्रमोर्वशीच्या आधारानें सदरप्रमाणें लिहिलें आहे. किंमत. १४ आणे.

राजा अग्निमित्र—हें संस्कृत मालविकाग्निमित्र नाटकाच्या आधारानें लिहिलें आहे. किंमत १ रुपया.

शिवदिग्विजय अथवा तरुण शिवाजी नाटक-किं. १रु.

...पू गोखले यांचें चरित्र—२ री आवृत्ति. किं. १२ आ.

...पुंदरी आणि वसंतसेन—भाग १ ला, २ रा व ३ रा अनुक्रमें किं. ४ आणे ६ आणे व १० आणे.

...द्गुणीसगुणा—(स्त्रियांस वाचण्याजोगें) किं. ४ आ.

...संगीत ययाति नाटक—( हें फार रसाळ असून ... पद्यें किर्लोसकरांचे चालींवर आहेत. ) किं० ८ आ...

**मनोहर नाटक**—( दुःखपर्यवसायी. )
गली असून प्रत्येक अंकास चित्र आहे. ।५
**सुंदराबाई**–(एक चटकदार लहानशी गोष्ट) किं. ए
**चातुर्यरत्नावलि** भाग १, २, ३, ४, प्रत्येकी किं. अर्धा
**गोदावरी** अथवा **दुर्दैवीसून** ( नवीन पुस्तक. ) या
स्तकांत आपल्या हिंदु कुटुंबांतील निर्दय सास्वा
पल्या सुनांस कशा छळतात व त्रास देतात याचें खरें
हुबेहुब वर्णन केलें आहे. किंमत १२ आणे.

---

## वैद्य विज्ञान.

( वैद्यकी संबंधी नवीन पुस्तक. )

वैद्यकी विषयीं आपल्या पूर्वींच्या ऋषींनीं अति
शोध करून निरनिराळ्या वैद्यक विषयांवर शेंकडों
लिहून ठेविले आहेत, परंतु ते ग्रंथ संस्कृत भाषेंत अ
त्यामुळें प्राकृत जनांस त्या विद्येचा लाभ करून
येत नाहीं, ही एक मोठी अडचण आहे. ती अड
दूर होऊन थोडक्यांत व सुलभरीतीनें सर्वां वै
विद्येचें ज्ञान करून घेतां यावें, ह्मणून पुष्कळ दिवसां
मेहनतीनें हें पुस्तक तयार करविलें आहे. या पुस्त
सर्व रोगांवर फक्त वनस्पतींचेच प्रयोग सांगितले
ते अनुभविक व अत्यंत उपयुक्त असे आहेत. या पु
कापासून वैद्य व इतर लोक या सर्वांस फारच उप
होईल अशी याची रचना केली आहे. किंमत १
टपाल खर्च १ आणा.

वासुदेव मोरेश्वर पोतदा
कांदेवाडी,